दैनिक **आरंभ मराठी**

www.arambhmarathi.com


सुविचार

विजेते वेगळ्या गोष्टी करत नाही
ते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात.



**उसावर पांढऱ्या माशीचा वाढता कहर; प्रतिबंधात्मक उपाय करण्याची गरज**

पेज 4



■ धाराशिव ■ दैनिक ■ वर्ष 2 रे ■ अंक 180 ■रविवार,दि .10 ऑगस्ट 2025■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रु 5


# भाजपच्या निष्ठावान कार्यकर्त्यांचा बावनकुळेंच्या कार्यक्रमावर बहिष्कार

## पदाधिकारी म्हणाले, आम्ही स्वाभिमानी कार्यकर्ते, हा पक्षाचा कार्यक्रम नव्हताच!

मोहन जाधव | आरंभ मराठी

मुरूमः उमरगा तालुक्यातील मुरुम साखर कारखान्यात ७ ऑगस्ट रोजी झालेला शेतकरी मेळावा हा भाजपचा नव्हताच, तर फक्त शरण पाटील फाउंडेशनचा शोभेचा कार्यक्रम होता, असा स्फोटक आरोप एका वरिष्ठ भाजप पदाधिकाऱ्याने केला आहे. यामुळे पक्षातील नाराजी आता गुप्त न राहता थेट उघड झाली आहे. पक्षाचा कार्यक्रम असता तर एकही निष्ठावान कार्यकर्ता घरी बसला नसता. आम्ही आयुष्य पक्षासाठी झिजवले, पण या कार्यक्रमाला आमंत्रणही नव्हते, असे नाव न सांगण्याच्या अटीवर पदाधिकारी म्हणाले. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत मुरूमच्या कारखान्यावर आयोजित ऊस शेतीत तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. ७.४५ ला सुरू होणारा कार्यक्रम तब्बल दोन तास उशिरा सुरू झाला. मंत्री रात्री १० वाजता पोहोचले, भाषण ११ नंतर सुरू झाले. तोपर्यंत अनेक शेतकरी नाराज होऊन निघून गेले. हा मेळावा शेतकऱ्यांचा की मंत्र्यांच्या विलंबाचा? असा सवाल शेतकऱ्यांतून उपस्थित होत होता.



### जुने लढवय्ये गायब,गटबाजीचे संकेत

पक्षाशी संकटाच्या काळात खंबीर उभे राहिलेले ज्येष्ठ नेते व जनाधार असलेले कार्यकर्ते या कार्यक्रमाला अनुपस्थित होते. भाजप उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत मिनीयारही गैरहजर होते. परंतु दुसऱ्याच दिवशी बावनकुळे यांनी त्यांच्या घरी जाऊन सदिच्छा भेट दिली. तेव्हा भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीचे नेते मोठ्या फौजेसह उपस्थित होते.

### २०२९ आधीच रणसंग्राम?

या पार्श्वभूमीवर २०२९ च्या निवडणुकीसाठी गटबाजी आणि शक्तीप्रदर्शनाची खेळी सुरू झाल्याच्या चर्चा तालुक्यात सुरू झाल्या आहेत. स्टेजवर फक्त तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, माजी जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर माने, राजेंद्र पाटील यांच्यासह मोजकेच कार्यकर्ते दिसले.

### थेट इशारा अंतर्गत ज्वाला भडकणार ?

हा कार्यक्रम पक्षाचा असता तर आम्ही अहोरात्र काम केले असते, या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या वक्तव्याने नेतृत्वालाच थेट इशारा दिला आहे. भाजपमधील निष्ठावान कार्यकर्त्यांच्या मनातला राग आणि अविश्वास आता सार्वजनिक पद्धतीने ओसंडत असल्याचे या मेळाव्याने सिद्धकेलेआहे.

## मूकबधीर विद्यार्थ्यांसोबत रक्षाबंधन



आरंभ मराठी | कळंब

कळंब शहरातील संत ज्ञानेश्वर महाराज निवासी विद्यालयामध्ये स्व. गणपतरावजी कथले युवक आघाडीच्या वतीने शनिवारी (दि.९) रक्षाबंधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळेतील मुलींनी उत्कृष्ट राख्या बनवल्या होत्या. भेट म्हणून आघाडीच्या वतीने मुलींच्या दैनंदिन वापरातील वस्तूचे गिफ्ट पाऊच देण्यात आले. सोबत खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी संजय घुले, सतपाल बनसोडे, शिवाजी शिरसाठ, प्रा.अरविंद शिंदे, प्रा.संजय सावंत तसेच कथले युवक आघाडीचे बाळासाहेब कथले, सुमित बलदोटा, यश सुराणा, नवनाथ पुरी, प्रकाश खामकर, मनोज फल्ले, सोमनाथ जगताप, धर्मराज पुरी, शाळेचे मुख्याध्यापक बालाजी जाधवर आणि शिक्षक वर्ग उपस्थित होते.

## विविधरंगी फुलांची सजावट, श्री.मुद्गलेश्वरांच्या दर्शनासाठी गर्दी



श्रावणानिमित्त तुळजापूर शहरानजिकच्या सिंदफळ येथील श्री मुद्गलेश्वरांच्या मंदिरात महादेवाच्या पिंडीला दररोज विविध प्रकारची विशेष पूजा केली जाते.शनिवारी सायंकाळी देवाची विविधरंगी फुलांची सजावट करण्यात आली. ही आकर्षक सजावट पाहण्यासाठी तसेच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

## रुईभरच्या श्रीदत्त मंदिरात राखी पौर्णिमेनिमित्त उत्सव

आरंभ मराठी | धाराशिव

राखी पौर्णिमेनिमित्त तालुक्यातील रुईभर येथील श्री दत्त मंदिर संस्थान येथे विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यक्रमाची सुरुवात सकाळी श्री दत्तमूर्ती अभिषेक व महापूजेद्वारे झाली. यानंतर श्री दत्त महाराज रुईकर आप्पा बाबा महाराज यांचे मंदिरात आगमन झाले. भक्तांनी फुलांच्या पायघड्या अर्पण करत भावपूर्ण स्वागत केले. उपस्थित यजमानांकडून आप्पा बाबांची पाद्यपूजा करण्यात आली. यावेळी भक्तांची मोठी उपस्थिती होती. यानंतर महाआरती आणि सामूहिक दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. संध्याकाळी पारंपरिक भजन-कीर्तनाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. मंदिरात श्री दत्तात्रेयांची सजवलेली मूर्ती, आकर्षक पुष्पसजावट व दिव्य प्रकाशाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

## उत्कृष्ठ कार्याबद्दल जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांचा सत्कार




आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांचा प्रशासन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल व गुणवत्तेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ब्राँझ पदक देऊन नुकताच गौरव करण्यात आला. या गौरवामुळे संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचा सन्मान उंचावला असून, जिल्ह्याच्या नावलौकिकात मोठी भर पडली आहे. याबद्दल भाजपा तालुका चिटणीस सचिन लोमटे, दिव्यांग आघाडी तालुका संयोजक विठ्ठल गायकवाड, युवक प्रशांत जमादार, जि.प. माजी सदस्य अंजलीताई बेताळे, अल्काताई गौरकार, सरचिटणीस भाजपा युवा मोर्चा शिवानीताई परदेशी यांच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी पुजार यांनी धाराशिव जिल्ह्यातील प्रशासन, लोकसहभाग, जलसंधारण, डिजिटायझेशन आणि शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांना आणि कार्यक्षमतेला मिळालेला हा पुरस्कार जिल्ह्यातील सर्व नागरिकांसाठी अभिमानास्पद ठरला आहे. या यशाबद्दल जिल्ह्यात सर्व स्तरातून कीर्ती किरण पुजार यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांनी दिलेल्या प्रेरणादायी सेवेमुळे प्रशासन यंत्रणेत सकारात्मक ऊर्जा संचारली आहे.

## भाजपच्या ईट येथील जनता दरबारास उत्स्फूर्त प्रतिसाद; नागरिकांच्या ८७ तक्रारी दाखल

आरंभ मराठी | भूम




भूम तालुक्यात भारतीय जनता पक्षाच्या वतीने जनता दरबार घेऊन जनतेने मांडलेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी लक्ष देऊन प्रश्न मार्गी लावले जाणार असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे राज्य परिषद सदस्य बाळासाहेब क्षिरसागर यांनी ईट येथे आयोजित केलेल्या जनता दरबारात केले. शनिवारी (दि.९) भूम तालुक्यातील ईट येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्प ते सिद्धी या कल्पनेतून मा. आ.सुजितसिंह ठाकुर, आमदार राणाजगजीतसिंह पाटील, जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या आदेशानुसार व राज्य परिषद सदस्य बाळासाहेब क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली जनता दरबार घेण्यात आला. जनता दरबाराम ध्ये ८७ तक्रारी दाखल झाल्या. यामध्ये पोलीस स्टेशन, कृषी विभाग, तहसील, जिल्हा परिषद, पाणीपुरवठा विभाग, पंचायत समिती, बांधकाम विभाग, अशा वेगवेगळ्या कार्यालयाशी निगडित तक्रारींचा समावेश होता. दरम्यान जनता दरबार स्थळातूनच संबंधित अधिकाऱ्यांना फोनद्वारे चर्चा करून १३ नागरिकांचे प्रश्न मार्गी लावले. उर्वरित प्रश्न देखील संबंधित अधिकाऱ्याकडे पाठपुरावा करून मार्गी लावले जातील असा विश्वास बाळासाहेब क्षिरसागर यांनी नागरिकांना दिला. यापुढे तालुक्यातील प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये जनता दरबार घेतला जाणार आहे. जनता दरबार कार्यक्रमा प्रसंगी तालुका अध्यक्ष संतोष सुपेकर, भाजपा ज्येष्ठ नेते काकासाहेब चव्हाण, मा.ता. अध्यक्ष महादेव वडेकर, तसेच राजसिंह पांडे , अ.जा. ता. अध्यक्ष प्रदीप साठे, शहराध्यक्ष बाबासाहेब वीर, सरचिटणीस रघुनाथ वाघमोडे, शरद चोरमले, युवा उपाध्यक्ष अंकुश तिवारी, दिनकर कांबळे, किसान मोर्चा ता. अध्यक्ष विकास जालन, सुरेंद्र बोंदार्डे, भाऊसाहेब आव्हाड, पप्पू थोरात, राम चव्हाण, मारुती माळी, राहुल लिमकर, बाबासाहेब गीते, सिद्धार्थ जाधव, आकाश शेटे, अशोक महानवर व पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार राणा पाटील यांच्याकडून शहरवासीयांची दिशाभूल,जुन्याच कामांची माध्यमांना माहिती

## शिवसेना उबाठा गटाच्या शहरप्रमुखांकडून टीका, म्हणाले, पंतप्रधानांना बोलवा पण, शहरवासियांची खड्ड्यातून मुक्तता करा

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहरातील रस्त्याच्या तसेच अन्य विकास कामांच्या उद्घाटनासाठी राज्याचे मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना निमंत्रित करण्यात आले असल्याची माहिती आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी शुक्रवारी माध्यमांना दिली होती. यावर प्रतिक्रिया देताना शिवसेना उबाठा गटाच्या शहर प्रमुखांनी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना उपरोधिक सल्ला दिला असून, तुम्ही मुख्यमंत्र्यांनाच नव्हे तर देशाच्या पंतप्रधानांना बोलवा,मात्र, धाराशिवरांना खड्ड्यापासून मुक्त करा, असे म्हटले आहे.तसेच जुन्याच कामांची माध्यमांना माहिती देऊन त्यांनी दिशाभूल केल्याचा आरोप करण्यात आला आहे. शहरप्रमुख म्हणाले, आमदार राणा पाटील हे सांगताना शब्दश्चल करत असून ही पूर्वीचीच कामे आहेत. या कामाला २३ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रशासकीय मंजुरी मिळाली. त्यानंतर सात दिवसात निविदा प्रक्रिया राबवणे बंधनकारक होते, तर ९० दिवसात ही प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित होते. १८ महिने होऊनही निविदा उघडली नव्हती,जनतेच्या हितासाठी महाविकास आघाडीने हा विषय लावून धरला. सहा जानेवारी रोजी जनतेसह रस्ता




रोको केला,तेव्हा मुख्याधिकारी यांनी २८ फेब्रुवारीपर्यंत कामाला सुरूवात करु असे लेखी आश्वासन दिले. त्यामुळे आम्ही आंदोलन स्थगित केले. २८ फेब्रुवारी नंतरही कामाच्या बाबतीत हालचाल दिसली नाही. त्या आंदोलनानंतर २५ जानेवारी रोजी निविदा दर उघडण्यात आले. तरीही कामे सुरु होत नाहीत हे पाहून २८ एप्रिल रोजी महाविकास आघाडीकडून आमरण उपोषण सुरु केले. तिसऱ्या दिवशी पालकमंत्री यांनी आंदोलनास भेट देऊन कामे करण्यात येतील असे आश्वासन दिले. पुढे दोन मे रोजीच ही कामे अंदाज पत्रकीय दराने करून घेण्याबाबत नगरपरिषद संचालनालय यांनी पालिका प्रशासनाला पत्र दिले होते. त्यानुसार २३ मे रोजी प्रधान सचिव यांच्या बैठकित हा निर्णय झाला. पुढे गुत्तेदार देखील अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार झाले. यामुळे शहरवासियांचे २२ कोटी रुपये वाचले. त्यानंतर पालकमंत्री यांनी पुन्हा फेरनिविदा काढण्यात येतील,असे सांगितले जाते पण अजूनही सत्ताधारी नेत्याच्या वर्चस्व वादात ही प्रक्रिया पुढे गेलेली नाही हे वास्तव आहे. अचानक पत्रकार परिषद घेऊन नवीनच निधी आल्यासारखे दाखवून कोणाची फसगत करायची होती, असा सवाल शहर प्रमुख यांनी विचारला.

## पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले यांची पदोन्नती; आर्थिक गुन्हे शाखेच्या उपअधीक्षकपदी नियुक्ती

आरंभ मराठी | धाराशिव

उमरगा पोलीस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक अश्विनी भोसले यांची पदोन्नती होऊन धाराशिव येथील आर्थिक गुन्हे शाखेच्या उपअधीक्षकपदी त्यांची नियुक्ती झाली आहे. लवकरच त्या नवीन जबाबदारी स्वीकारणार असून, त्यांच्या जागी येणाऱ्या पोलिस निरीक्षकांसमोर वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवून जनतेचा विश्वास जिंकण्याचे मोठे आव्हान असेल. भोसले यांच्या कार्यकाळात उमरगा पोलीस ठाण्याने अनेक उल्लेखनीय कामगिरी केली. महाराष्ट्र शासनाच्या ''१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा'' विशेष मोहिमेत उमरगा पोलीस ठाण्याने मराठवाड्यात प्रथम क्रमांक पटकावून तालुक्याचा मान उंचावला. याशिवाय, पोलिस ठाण्याचे सुशोभीकरण, रंगरंगोटी, वृक्षारोपण यांसारख्या उपक्रमांद्वारे ठाण्याचा कायापालट करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळे ''जिल्ह्यातील सर्वांत सुंदर पोलीस ठाणे'' अशी उमरगा पोलीस ठाण्याची ओळख निर्माण झाली.



अश्विनी भोसले यांच्या या अतुलनीय कार्याची सर्वत्र प्रशंसा होत असून, त्यांच्या कारकीर्दीत नोंदवलेला हा सुवर्ण अध्याय उमरगा पोलीस ठाण्याच्या इतिहासात कायमस्वरूपी नोंदला जाणार आहे.

CMYK

02


www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी


संपादकीय

रविवार,दि .10 ऑगस्ट 2025

# सत्यशोधक 'रा.नां.'च्या थोर कार्याला उजाळा




**थोर** समाजसुधारक,दलितमित्र स्मृतिशेष रामचंद्र नारायणराव चव्हाण यांचा जन्म १९१३ सालचा आणि निधन १९९३ सालातला.त्यांच्या अफाट कार्याच्या गौरवार्थ कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद,गुलबर्गा यांच्यावतीने 'माझी मराठी' या त्रैमासिकाने रा.ना. चव्हाण यांचे दोन स्मृतीविशेषांक २०१४-१५ साली प्रकाशित केले होते.स्मृतिशेष भालचंद्र शिंदे यांच्या संपादनाखाली एका उपेक्षित विचारवंताचा सांस्कृतिक वनवास संपविल्याचा गौरवपूर्ण उल्लेख डॉ.श्रीपाल सबनीस यांनी आपल्या दीर्घ प्रस्तावनेच्या आरंभीच केला आहे. संपादक मंडळातील प्रा.भालचंद्र शिंदे यांचे सहकारी प्रभाकर सलगरे,गुरय्या स्वामी,बी.ए.कांबळे आणि इतरांचेही या कार्यासाठी ऋण मानले पाहिजे. एका जाणत्या समाजसुधारकाच्या प्रेमापोटी,गौरवाखातर अनेक नामवंत लेखक,विचारवंतांनी आपली लेखणी चालवली,प्रा.शिंदे यांच्या साक्षेपी संपादनामुळे 'रा.ना.चव्हाण एक सत्यशोधक' हे महत्त्वाचे पुस्तक प्रकाशित होऊ शकले.या पुस्तकात रा.नां.च्या वैचारिक,सामाजिक कार्याचा आढावा मान्यवरांनी घेतला आहे. संपादकीय भूमिका मांडताना प्रा.भालचंद्र शिंदे यांनी सतत परिवर्तनाचा ध्यास असलेल्या एका थोर व्यक्तीमत्वाचे लेखनधन जतन होण्यासाठी चव्हाण कुटुंबियांनी दिलेल्या योगदानाचा विशेष उल्लेख केला आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा वैचारिक आणि सामाजिक वारसा चालविणाऱ्या रा.नां.नी तथागत गौतम बुद्धांपासून ते छत्रपती शिवराय,महात्मा फुले,राजर्षी शाहू,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,यशवंतराव चव्हाण आदि महामानवांवर भरभरुन लेखन केले आहे.पण ते त्यांच्या हयातीत समाज आणि साहित्यविश्वाकडून घोर उपेक्षित ठरले.मात्र त्यांचे चिरंजीव रमेश चव्हाण आणि स्नुषा वैशाली यांनी पुढाकार घेऊन त्यांचे हे विचारसंचित जनतेपुढे आणले आहे ही अतिशय समाधानाची बाब आहे.त्यामुळे मराठी वैचारिक साहित्यात मोलाची भर पडून ते अधिक समृद्ध होण्यास मदत झाली आहे.सजग सत्यशोधकाच्या दृष्टीने सामाजिक सुधारणा करतानाच लोकप्रबोधनाची मशाल हाती धरलेल्या निवडक मराठी समाजधुरीणांमध्ये रा.नां. चा समावेश होतो.कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांना गुरुस्थानी मानून परिवर्तनवादी विचारांना पुढे घेऊन जाण्यात आपले अवघे आयुष्य खर्ची घालणाऱ्या रा.नां.चे स्मरण या पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांपुढे येते. वाई येथे जन्मलेल्या रा.ना. यांची उपेक्षा जशी बहूजन समाजाने केली तशीच ती अभिजनवर्गानेही केली असल्याची खंत प्रा.शिंदे यांनी व्यक्त केली आहे.मात्र स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राला यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे द्रष्टे नेतृत्व लाभल्यामुळे रा.नां.सारख्या समाजासाठी अथकपणे आपले योगदान दिलेल्या महान विभुतींच्या कार्याची ओळख लोकांपुढे येऊ शकली. डॉ.सबनीस यांनी आपल्या प्रस्तावनेमधून रा.नां.च्या लोकहितैषी कार्याचा विस्तृत आणि अभ्यासपूर्ण आढावा घेतला आहे परंतू रा.नां.विषयी लिहिताना काही विचारवंतांनी आपला हात आखडता घेतला असल्याचा तक्रारीचा अनावश्यक सूर आळवला आहे,जो सहज टाळता येऊ शकला असता असे वाटते.सबनीसांनी रा.नां.च्या सकलजनकल्याणाच्या दृष्टीचा सार्थ गौरव केला आहे.सत्यशोधकी परंपरेच्या मुशीतून तयार झालेले लेखक,समाजसुधारक,विचारवंत असा रा.नां.चा लौकिक असला तरी ब्राम्हो समाज,प्रार्थना समाज यांचा प्रभावही त्यांच्यावर होता,यावर प्रा.डॉ.मा.प.मंगुडकर यांनी आपल्या लेखातून कटाक्ष टाकला आहे.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दलितमित्र रा.ना.चव्हाण यांच्या लेखनाची ठळक वैशिष्ट्ये विशद केली आहेत.आपल्या अफाट विवेकशक्तीच्या बळावरच रा.नां.नी वस्तुनिष्ठ वैचारिक मांडणीची उभारणी केली असल्याचे निरिक्षण तर्कतीर्थ नोंदवताना दिसतात.रा.नां.चे सुपुत्र रमेश चव्हाण यांनी वाई गावची सामाजिक पार्श्वभूमी सांगताना वाई हे कसे पेशवाई वळणाचे होते,प्रतिगामी विचाराचे केंद्र होते यावर दृष्टीक्षेप टाकला आहे.अशा वातावरणात रा.नां.नी आपलेसमाजसुधारणा कार्य आणि लेखनकार्य कसे नेटाने चालवले याचे साद्यंत वर्णन रमेश चव्हाण यांनी केले आहे.आपल्या आईने कुटुंब सांभाळताना पतीला म्हणजेच 'रा.नां' ना कशी साथ दिली याचीही माहिती दिली आहे.त्यातून संपूर्ण चव्हाण कुटुंबच कसे परिवर्तनवादी चळवळीशी बांधले गेले होते यावर चांगलाच प्रकाश पडतो. अभ्यास-संशोधन व प्रबोधन असा प्रवास असलेल्या 'रानां' च्या लेखन वाङ्मयाचे मूल्यमापन आणि चिकित्सा होण्याची गरज शेवटी रमेश चव्हाण यांनी प्रतिपादन केली आहे.समाजसेवक बाबा आढाव यांनी आपल्या लेखातून रा.नां.यांना महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचे आधुनिक बखरकार म्हणून गौरविले आहे. तर द.मा.मिरासदार यांनी 'बहूजन हिताय' हीच रा.ना.यांच्या लेखनाची मूळ प्रेरणा होती असे म्हटले आहे.डॉ.आ.ह.साळुंखे यांनी 'सामाजिक प्रबोधनाची व्रतस्थ वाटचाल' या लेखातून रा.ना.चव्हाण हे कसे समतोल तत्त्वचिंतक होते आणि त्यांच्या समग्र लेखनामधून आपल्या समाजातील किमान दोनशे वर्षांचा इतिहास कसा मांडला गेला आहे याचे महत्त्वपूर्ण उल्लेख केले आहेत.प्रा.मो.नि.ठोके यांनी त्यांचे विचारविश्व सांगत सुमारे हजार पृष्ठांचे लेखन करणारे ते दांडगे व्यासंगी लेखक असल्याचे अधोरेखीत केले आहे.महाराष्ट्रातील संत साहित्यापासून ते समाजसुधारकांच्या कार्याचा गौरव रा.ना. यांच्या लेखणीने शब्दबद्ध केला आहे.हा परिवर्तनवादी व पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी मोठा वैचारिक ठेवा आहे यात अजिबात शंका नाही.वैदिकवादी विचाराला विरोध करणाऱ्या बहूजन लेखक,समाजसुधारक आणि विचारवंतांविषयी जाणीवपूर्वक मौन बाळगून त्यांच्या थोरकार्यांना अनुल्लेखाने मारण्याचे,दडपण्याचे सामाजिक पाप इथले तथाकथित मुख्य प्रवाहातले साहित्यिक,वक्ते करीत आले आहेत.परंतू अशा अनेक अडथळ्यांना न जुमानतासमाजातील अंधश्रद्धा,कर्मकांड यांच्यावर आसूड ओढण्याची सत्यशोधकी परंपरा आजतागायत सुरुच आहे त्यात अजिबात खंड नाही.किंबहूना श्रमण विरुद्ध वैदिक हा महासंघर्ष अद्यापही जारी आहे.रा.नां.चव्हाण यांच्या सारखे कर्ते सुधारणावादी विचारवंत परिवर्तनवादी चळवळी करिता दीपस्तंभाचेच काम करीत असतात,हे तितकेच खरे आहे.समाजप्रबोधनकार्यात जाणीवपूर्वक सातत्य राखले नाही तर सुशिक्षीत लोकांमध्येही अंधश्रद्धा बोकाळल्याशिवाय राहणार नाहीत,अशी धारणा असलेले रा.ना.कसे दूरदृष्टीचे होते याची संभाजीराव पाटणे यांनी आपल्या लेखातून चर्चा केली आहे.भाई वैद्य यांनी चव्हाणयांचे नांगरी शैक्षणिक परंपरेच्या मांडणीचे महत्त्व सध्याच्या काळात काय आहे हे भारतीय समाजाने समजावून घेतले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.कॉम्रेड गोविंदआण्णा पानसरे यांनी रयतेचे,कुळवाड्यांचे, मावळ्यांचे,श्रमिकांचे राज्य आणण्यासाठी हे लेखन अतिशय उपयुक्त ठरणार असल्याचा निर्वाळा दिला आहे.प्रा.डॉ.एस.एस.भोसले यांनी रा.ना.म्हणजे नांगरी परंपपरेतील म्हणजेच शेतकरी परंपरेतील अस्सल गावरान रसायन असल्याचे नमूद करीत बहूजन समाजाच्या सर्वांगीण उत्थानासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची विस्तृतपणे माहिती मांडली आहे.रा.ना हे कसे एक आदर्श सत्यशोधक होते याला प्रा.डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी आपल्या लेखामधून उजाळा दिला आहे.डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांनी रा.ना.चव्हाण म्हणजे मराठीतील एक विवेकशील,संयमी,समन्वयवादी तरीही परखडपणे आपले विचार मांडणारे एक महत्त्वाचे विचारवंत असल्याचे नोंदवले आहे.डॉ.सदानंद मोरे यांनी रा.ना.हे थोर धर्मचिंतक आणि विचारवंत होते तसेच त्यांनी समाजसुधारणांचे चक्र पुढे नेले असल्याचे सांगितले आहे.डॉ.द.ता भोसले यांच्या लेखातून विज्ञान आणि अध्यात्म यांच्या पायावर सामाजिक प्रश्नांचे प्रबोधन करणाऱ्या एका विचारवंताचे दर्शन घडते.रमेश जाधव,हरी नरके,सुरेंद्र जोंधळे,अ.र.कुलकर्णी,रमेश डुबल, प्रकाश पवार,पंडित टापरे,वैशाली चव्हाण,मधु नेने,जनार्दन वाघमारे आदि लेखक,विचारवंतांनीही आपापल्या अभ्यासपूर्ण लेखांमधून रा.ना.चव्हाण यांच्या समग्र कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला आहे.एकूणच सत्यशोधकी परंपरेतील एका जाणत्या सुधारकाच्या थोर कार्याविषयी या पुस्तकातून मोलाची माहिती उपलब्ध झाली आहे.






**भरत यादव**
yadavbh515@gmail.com
9890140500

**पुस्तकाचे नाव:**
**रा.ना.चव्हाण एक सत्यशोधक**
**संपादक: भालचंद्र शिंदे**
**प्रकाशक:**
**कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद**
**पृष्ठसंख्या: ३६८ मूल्य: ३५० रु**

# श्री कृष्ण जन्मोत्सवानिमित्त तुळजापूर येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ



**आरंभ मराठी | तुळजापूर**

श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त तुळजापूर येथील कासार गल्लीत विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विठ्ठल रुक्मणी मंदिरात शनिवारपासून (दि.९) रोजी अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास सुरुवात झाली. सकाळी १० वाजता माजी नगरसेवक सुनील रोचकरी व त्यांच्या सौभाग्यवती सौ.प्रियंका यांच्या हस्ते ग्रंथ पूजा करण्यात आली. यावेळी व्यासपीठ चालक ह भ प खंडू महाराज हांडे तसेच ह भ प खंडू महाराज भास्कर (गवळी) व उपाध्य मंडळाचे अध्यक्ष अनंत कोंडो, विनोद सोजी, मुन्नाभाई कदम, नितीन मस्के, अण्णासाहेब अमृतराव, भालेकर इत्यादी उपस्थित होते. सप्ताहाचे हे ४८ वर्ष असून रोज काकड आरती, नित्त पूजा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण गाथा, भजन, हरिपाठ, व किर्तन असे रोज कार्यक्रम होणार आहेत. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे शनिवार दिनांक १६ ऑगस्ट रोजी ह भ.प हनुमंत महाराज काळे (बोरगाव) यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर माजी नगरसेवक सुनील रोचकरी यांच्या वतीने काल्याचा महाप्रसाद संपन्न होईल. सप्ताहाच्या काळात रोज कीर्तनसेवा होणार आहे. यामध्ये कीर्तनकार ह भ प तानाजी महाराज भोईटे, ह भ प गणेश महाराज काटे, ह भ प पांडुरंग महाराज लोमटे, ह भ प महाराज इंगळे, ह भ प केशव महाराज गुरव, व ह भ प सचिन महाराज जोशी यांचे कीर्तन होणार आहेत. तरी सर्व भक्तांनी कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कृष्णा गणेश उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी शिवरत्न मोटे यांची निवड

**आरंभ मराठी | तुळजापूर**



तुळजापूर शहरातील प्रतीक्षा नगर येथील कृष्णा गणेश उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी शिवरत्न तुकाराम मोटे यांची निवड करण्यात आली आहे. तर उपाध्यक्षपदी -पियुष दत्ता खांडेकर ,खजिनदार श्रेयश किरण जाधव , सचिव आदित्य गजानन कांबळे, व्यवस्थापक प्रमुख अभिषेक पाटील, धनु जाधव, मिरवणूक प्रमुख मंथन कदम, यांची निवड करण्यात आली आहे.
यावेळी गजानन कांबळे, गणेश बागल, सतीश साळुंखे, बिभीषण लाटे, सुभाष शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# सामाजिक कार्यातील आठवण: कोविड १९

**जागतिक** पातळीवर -१९ ही प्रचंड मोठी महामारी सुरू झाली.या महामारीमध्ये डोळ्यादेखत हजारो जीवांना आपला प्राण गमवावा लागला. यावेळी मरण पाठीवर घेऊन भूमिपुत्र वाघ,विजयाताई वाघ,निकिता वाघ, आणि निखिल वाघ या एकाच कुटुंबातल्या चार सदस्यांनी समर्पण करायचं ठरवलं...

मरणाला थोपवण्याचं सामर्थ्य सावित्री माता फुले यांनी प्लेगच्या साथीत दाखवलं होतं.त्या इतिहासाची पुनरावृत्ती कोविडच्या निमित्ताने समोर आली होती.

हजारो माणसांचे बळी डोळ्यादेखत जात होते. समोर मरण आहे हे नक्की स्वीकारुन आमच्या कुटुंबातील चारही जण कामाला लागले.

अचानकपणे प्रो.निकिता वाघ यांना सिंहगड इन्स्टिट्यूट मधून कॉल आला अर्जंट हॉस्पिटल जॉईन करण्याची ऑर्डर आली.

चार महिन्याची प्रेग्नेंसी असतानाही निकिता वाघ यांनी रातोरात घर सोडलं. हॉस्पिटल जॉईन केलं.

साहजिक जाताना सर्वांचे डोळे पाणावले होते.

जाता जाता मी म्हणलं बायडू तुम्ही जात आहात माता सावित्री यांनी केलेला त्याग आणि त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून लढत रहा.हजारो जीवाला वाचवण्यासाठी प्रयत्न करत रहा. वाचलो जगलो तर पुन्हा भेटू म्हणून निरोप दिला.

डोळ्यातील आसवांचा कोंडमारा करून प्रवास सुरू केला.उमरगा सोडलं आणि पुणे जॉईन केलं.

दुसऱ्या बाजूला निखिल वाघ,यांनी ऑक्सफॅम इंडिया ही संस्था जॉईन केली.नागपूर,पुणे,मुंबई बीड,धाराशिव ते मुंबई जिथे जमेल जिथे गरज आहे अशा लोकांना अन्नधान्य,रेशन,कपडे, जेवणाचे डबे देण्यापासून, सोबत सरकारी हॉस्पिटमध्ये लागणाऱ्या साधनांची मदत द्यायला सुरु झाली,कॉट,बेड, ऑक्सिजन सिलेंडर,पीपी कीट,मास्क,औषधे याची मदत द्यायला सुरुवात केली.

रात्रभर प्रवास करायचा आणि दिवसभर मदत करायची.हा त्याचा नित्याचाच क्रम तयार झाला होता. सोबत महाराष्ट्र आणी कर्नाटकामध्ये ऑक्सिजन प्लांट तयार करून बांधून सरकारच्या ताब्यात दिले.

तर दुसऱ्या बाजूला समाज विकास संस्थेच्या माध्यमातून धाराशिव,पुणे, मुंबई जिथे जमेल तेवढी ताकद लावून सोबत ऑक्सफॅम इंडिया,स्माईल फाउंडेशन,लोखंडवाला फाउंडेशन, एफ इ एस आणि दानशूर देश परदेशातील मित्र यांचा सपोर्ट घेऊन किमान पाच लाख कुटुंबापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न वाघ कुटुंबाने केला.



ही लढाई मानवाच्या हिताची होती.
ही लढाई माणसांना मदतीचं स्त्रोत पूरवीणारी होती.
ही लढाई अनेक जीवांना जगविण्यासाठी होती.
ही लढाई उत्तरदायित्व म्हणून दुसऱ्यांसाठी कामी येणारी होती.
ही लढाई मानवतावादाचा एक दृष्टांत घेऊन होती. समाज विकास संस्थेसोबत आणि आमच्या कुटुंबा सोबत किती जणांची नावे घेऊ लाखो मित्र मदतीला उभे होते.त्या सर्व मित्रांची आठवण आल्यावाचून हा लेख,हा अनुभव पूर्ण होणार नाही.
हजारो लोकांचे हात मदतीला घेऊन आम्ही लढत राहिलो.यशस्वी झालोच.
तरीही हरलो होतो.
अनेक जीवांना मूठमाती देताना थकलो होतो. भागलो होतो.गहिवरलो होतो...
जीवाची दमछाक होत होती तरीही थांबलो नाही. कारण आम्हाला मिळालेला सावित्री माता फुले यांचा प्लेग या साथीतला वसा
आम्हाला पुन्हा पुन्हा चेथावणी देत होता.प्रेरणा देत होता. म्हणून आम्ही लढत राहिलो. शेवटच्या आश्वासापर्यंत...

**भूमिपुत्र वाघ**
९१७२९७२४८२

# जोत्स्ना सोनवणे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**आरंभ मराठी | धाराशिव**

*एकात्मिक बालविकास सेवा योजना तेर प्रकल्पातील उपळा (मा) विभागातील पर्यवेक्षिका ज्योत्स्ना सोनवणे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त तेर येथे प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी मनिषा पाटील, पर्यवेक्षिका वसुधा कुलकर्णी, पर्यवेक्षिका कल्पना मोहिते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मनिषा पाटील म्हणाल्या की, एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्पात नौकरी करणे हे आपले भाग्य आहे. आपण ज्ञानदानाचे कार्य करत आहोत. आपण संस्कारक्षम मुले घडविण्याचे काम करत आहोत, याचे फळ आपणांस चांगलेच मिळते. सेवा काळात महिलांनी नेहमी कार्यशील व आनंदी राहायला हवे.*



*यावेळी गंगासागर मस्के, शितल गाढवे, सुनिता लोमटे, विजय गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. सत्कारास उत्तर देताना सोनवणे म्हणाले की, सेवा काळात प्रत्येकाने नेमून दिलेले कार्य प्रामाणिकपणे पूर्ण करावे. आपली अंगणवाडी, आपला विभाग, सतत अग्रेसर कसा राहिल, यासाठी प्रयत्न केले पाहिजे. मी समाधानाने सेवानिवृत्त होत आहे. या कार्यक्रमास पथ्येवाड एस.बी., खेड, उपळा, तेर, येडशी, ढोकी, जागजी, कोंड येथील अंगणवाडी, मदतनीस, कार्यकर्ती उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जोशिला लोमटे यांनी केले.*

# मंत्री दौरे: जनतेसाठी की 'दिखाव्यासाठी'?

**काल-परवा** महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा धाराशिव आणि उमरगा दौरा झाला. साधारणपणे एखादा मंत्री जिल्ह्यात आला की तो लोकांच्या समस्यांना प्रत्यक्ष ऐकेल, तातडीच्या उपाययोजना जाहीर करेल आणि प्रशासनाला जबाबदार धरून कामाचा वेग वाढवेल अशी अपेक्षा असते. विशेषतः धाराशिव हा आकांक्षित, मागास जिल्हा असल्याने इथल्या नागरिकांच्या समस्या आणि अपेक्षा या अधिक तीव्र आहेत. पण या दौऱ्यात जे दिसले, त्यातून लोकांच्या मनात निराशा आणि असंतोष निर्माण झाला आहे.

**शेतकरी संकटाकडे दुर्लक्ष**

महाराष्ट्रात सध्या शेतकरी मेटाकूटीस आला आहे. निवडणुकीपूर्वी ''कर्जमाफी करू'' असा गाजावाजा करत दिलेली आश्वासने अजूनही पूर्ण झालेली नाहीत. अनेक शेतकरी अजूनही कर्जबाजारी आहेत, पिकांचे भाव कोसळलेले आहेत, नैसर्गिक आपत्तींचा फटका बसलेला आहे. अशा स्थितीत महसूल मंत्री जिल्ह्यात आले, तरी शेतकऱ्यांच्या वेदनांवर फुंकर घालणारी कोणतीही ठोस घोषणा झाली नाही.

**महसूल खात्यातील अनागोंदी आणि भ्रष्टाचार**

महसूल खात्याच्या कामकाजात प्रचंड त्रुटी, भ्रष्टाचार, विलंब आणि गैरसोयींबद्दल नागरिक वारंवार तक्रारी करतात. जमिनीचे उतारे, नोंदवही, वारस दाखले, जमीन मोजणी अशा मूलभूत कामांसाठी महिनोन्महिने चकरा माराव्या लागतात. पण या प्रश्नांवर मात करण्यासाठी ठोस पावले उचलण्याऐवजी मंत्री महोदयांच्या दौऱ्याचा केंद्रबिंदू स्वागत समारंभ आणि बॅनरबाजी ठरली.

**दिखावा आणि स्पर्धा**

मंत्री येणार म्हणजे स्वागतासाठी गावोगाव बॅनर, पोस्टर, तोरणे, फलकांची रेलचेल सुरू झाली. स्थानिक नेत्यांमध्ये ''मंत्र्यांच्या सोबत फोटो काढणे'', ''जवळीक साधणे'' आणि ''त्यांना घरी नेणे'' या शर्यती लागल्या. या राजकीय 'स्पर्धेत' जनता आणि जनतेचे प्रश्न मात्र दुर्लक्षित राहिले.

**संभाजी ब्रिगेडचा निषेध आणि जनतेपासून दुरावा**

संभाजी ब्रिगेडचे आण्णासाहेब पवार यांनी सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदवत ताफा अडवण्याचा प्रयत्न केला. खरं तर अशा प्रसंगी मंत्री महोदयांनी संबंधित आंदोलकाची भेट घेवून, त्यांचे म्हणणे व मागण्या ऐकून घेतल्या पाहिजेत. पण तसे घडले नाही. उलट एकट्यानेच घोषणा देणाऱ्या आंदोलकाला पोलिसांच्या ताफ्याने पोलीस गाडीत घालून, त्याला काही वेळ पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवत मुस्कटदाबी केली. या घटनेने मंत्र्यांचा दौरा लोकांच्या समस्यांपासून किती दूर आहे हे अधोरेखित केले. त्यातच उमरगा येथे 'जनता दरबार' न घेता, गडबडीत माघारी जाण्याने लोकांच्या असंतोषात भर पडली.

**बसवराज पाटील यांची सभा**

माजी मंत्री बसवराज पाटील यांनी मुरूम येथे भव्य सभा आयोजित केली. गावोगाव गाड्या पाठवून लोकांना बोलावले गेले, पण महसूल मंत्री वेळेवर न आल्याने अनेकजण निघून गेले. रात्री १० वाजल्यानंतरच सभा पार पडली, ज्यात बसवराज पाटील यांनी मंत्र्यांचे भरभरून कौतुक केले. सभा ही जनतेच्या हितासाठी नव्हे तर मंत्र्यांना खुश करण्याच्या सोहळ्यासारखी भासली. धाराशिव जिल्ह्या मध्यवर्ती सहकारी (DCC) बँकेला उर्जित अवस्थेत आणावे हा महत्वाचा मुद्दा बसवराज पाटील यांनी उपस्थित केला. पण या मुद्द्याला महसूल मंत्री किती गांभीर्याने घेतील आणि त्या दृष्टीने कितपत तात्काळ उपाययोजना करतील याबद्दल शंकाच आहे.

**लोकप्रतिनिधी म्हणजे सेवक, देव किंवा मसिहा नव्हे.**

लोकशाहीत मंत्री आणि लोकप्रतिनिधी हे जनतेचे सेवक असतात, पण अशा खर्चिक, प्रसिद्धीखोर दौऱ्यांनी त्यांना 'सेवक' नव्हे तर 'मालक' आणि अक्षरशः 'देवत्व' बहाल करण्याची प्रवृत्ती वाढते. बॅनरबाजी, स्वागत समारंभ, फोटोशूट, घरगुती पाहुणचार, फुलांच्या पायघड्या या सगळ्याने जनतेचे ऐकणे आणि तिच्यासाठी काम करणे हा लोकशाहीचा मुळ गाभा विसरला जातो.

धाराशिव-उमरगा दौऱ्याने लोकांच्या पदरात काहीही पडलं नाही. ना कर्जमाफीबद्दल ठोस भूमिका, ना महसूल खात्याच्या कामकाजात सुधारणा, ना ठोस घोषणा. फक्त राजकीय दिखावा, व्यक्तिपूजा आणि प्रसिद्धीच्या नावाखाली जनतेचा वेळ वाया गेला. लोकशाहीची खरी कसोटी म्हणजे जनतेच्या प्रश्नांवर तातडीने कारवाई, जी या दौऱ्यात कुठेही दिसून आली नाही.

अशा दौऱ्यांनी लोकांमध्ये उद्वेग वाढतो आणि लोकशाही केवळ ''शोभेची गोष्ट'' ठरते.






**ॲड. शीतल शामराव चव्हाण**
(मो.९९२१६५७३४६)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

CMYK

# निम्न तेरणा सिंचन योजनेच्या दुरुस्तीचा उद्या श्रीगणेशा

## ११३ कोटींचा दुरुस्ती निधी,जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन

**आरंभ मराठी | धाराशिव**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने धाराशिव, लोहारा आणि औसा तालुक्यातील गावांसाठी महत्वपूर्ण असलेल्या निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्ती कामासाठी सुमारे ११३ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर करण्यात आला असून, सोमवारी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते या कामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. सलग तीन वर्षांपासूनच्या पाठपुराव्याला यश आले आहे. या कामामुळे धाराशिव, लोहारा आणि



औसा तालुक्यातील २३ गावातील क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. अशक्यप्राय वाटणाऱ्या या दुरुस्तीच्या कामासाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निधीची अभूतपूर्व तरतूद केली. त्यामुळे मागील अनेक वर्षांपासून बंद असलेल्या या योजनेतील स्थापत्य, विद्युत आणि यांत्रिकीकरणाची कामे आता लवकरच सुरु होत असून या कामांचा शुभारंभ राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते सोमवारी दुपारी १ वाजता करण्यात येत असल्याची माहिती 'मित्र'चे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. आमदार राणा जगजितसिंह पाटील म्हणाले, या महत्वपूर्ण योजनेच्या दुरुस्तीसाठी राज्याचे मुख्यमंत्री तथा तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि जलसंपदामंत्री देवेंद्र फडणवीस यांना आपण स्वतः नोव्हेंबर २०२२ मध्ये भेटून योजनेच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्यासंबंधी विनंती केली होती. त्यानुसार तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याचवेळी जलसंपदा विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना कार्यवाही करण्याचे निर्देशही दिले होते. अनेक त्रुटींची पूर्तता करून या तिन्ही विभागाच्या समन्वयाने निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्ती कामासाठी ११३ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकीय किम तीच्या कामास तांत्रिक मान्यता मिळवून घेतली आणि त्यानंतर सलग पाठपुरावा करून प्रशासकीय मान्यताही मिळवून घेतली. मात्र निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरूस्तीसाठी तब्बल ११३ कोटी रूपयांची आवश्यकता होती. त्यामुळे या प्रस्तावास खास बाब म्हणून मंजुरी मिळवून घेण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागले. त्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांच्या शिवारात लवकरच निम्न तेरणेचे पाणी खळाळणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

### योजनेसाठी ४६.९७ दलघमी पाणी राखीव

माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या दूरदृष्टीमुळे तेव्हाच आपल्या हक्काचे ४६.९७ दलघमी पाणी आरक्षित करून ठेवण्यात आले आहे. आपल्या मागणीनुसार महायुती सरकारने विशेष बाब म्हणून ११३ कोटी रूपयांच्या या दुरूस्ती प्रस्तावास मंजुरी दिली. स्थापत्य विभागासाठी ५२.५१ कोटी, यांत्रिकी विभागासाठी ४३ कोटी १७ लाख आणि विद्युत विभागातील दुरुस्तीसाठी १७.८४ कोटी अशा एकूण ११३ कोटी ५३ लाख रुपयांची अभूतपूर्व तरतूद केल्याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारचे आभारही मानले आहेत.

# मुरुड येथील पोलीस बांधवांसोबत चिमुकल्यांचे स्नेहाचे रक्षाबंधन

## छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूलचा अभिनव उपक्रम

**आरंभ मराठी | पळसप**

मुरुड येथील श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूल यांच्या वतीने मुरुड पोलीस स्टेशन येथील पोलीस बांधवांसोबत रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला. अहोरात्र समाजाची सेवाच नव्हे तर आपल्या सर्वांचे संरक्षण करण्याचे काम पोलीस बांधव करत असतात. आपली ड्युटी करत असताना अनेक जणांना आपल्या घरातल्या व्यक्तीसोबत हा सण साजरा करता येत नाही. चोवीस तास आपल्या संरक्षणाची जबाबदारी ते कर्तव्यावर असताना घेत असतात. अनेकांना बरेच सण आपल्या कुटूंबासोबत साजरे करता येत नाहीत. याचाच विचार करून शाळेतील मुलींनी पोलीस बांधवांच्या बहिणीची भूमीका बजावत त्यांच्या हातावर राखी बांधून आपले संरक्षण करण्याची जबाबदारी सोपवली. यावेळी मुरुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक उजगरे, पवार सर , कुंभार सर व श्रीमती पांचाळ मॅडम यांच्यासह संपूर्ण स्टाफ उपस्थित होता. या दरम्यान शाळेचे प्राचार्य बाबू थॉमस, उपप्राचार्य उमेश कुंभार, समन्वयक रामेश्वर शेटे , दावेश सर यांच्यासह प्रगती कुंभार, शांती मार्डी, क्लेरम्मा जेकप, संध्या माळी, महादेवी माने, वैशाली देशमुख, श्रद्धा शितोळे, संगीता बिटले, संगीता नाईक, प्रिया मॅडम, जीशा मॅडम आदी उपस्थित होते. यावेळी शाळेतील पन्नास मुलींनी पोलीस बांधवांना राख्या बांधल्या तेंव्हा त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळ्या प्रकारचा आनंद व्यक्त होताना दिसून आला. शाळेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होताना दिसून येते.

# शिवसेनेकडून मित्रपक्ष भाजपला धक्का;अपसिंगा गावच्या सरपंचांनी घेतले शिवसेनेचे धनुष्य

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीच्या आधीच महायुतीत रस्सीखेच

**आरंभ मराठी | तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यात शिवसेनेने पुन्हा एकदा भाजपला धक्का देत अपसिंगा गावातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांसह अनेक कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश करून घेतला. विशेष म्हणजे हा प्रवेश विद्यमान भाजप आमदारांच्या स्वीय सहाय्यकाच्या गावी झाला असून, त्यामुळे तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून आगामी निवडणुकीच्या अगोदरच महायुतीत खेचाखेची सुरु झाली आहे.पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन हा पक्षप्रवेश करण्यात आला. पक्षाचे सचिव संजय मोरे, धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक, सहसंपर्कप्रमुख भगवान देवकते, जिल्हाप्रमुख मोहन पनुरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले व तुळजापूर तालुका प्रमुख अमोल जाधव यांच्या हस्ते नव्या कार्यकर्त्यांनी भगवा झेंडा हाती घेतला. या वेळी अपसिंगा गावचे भाजप सरपंच अजित क्षीरसागर, ग्रामपंचायत सदस्य सुजित सोनवणे, सचिन रोंगे, पांडुरंग



दिलपाक, आबा गुरव, सुरेश सुरडकर यांच्यासह वडगाव (देव) चे कपिल देवकते, वाणेगावचे सरपंच संभाजी कोरे पाटील, माजी सरपंच व ग्राम पंचायत सदस्य मोहन ढेकले, माजी उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य अप्पासाहेब पाटील यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यापूर्वीही शिवसेनेने तालुक्यातील अनेक भाजप नेत्यांचा प्रवेश घडवून आणला होता. आता पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर भाजपास खिंडार पाडले असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीपूर्वी महायुतीत वादाची ठिणगी पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रसंगी तालुका प्रमुख अमोल जाधव यांनी येत्या काळात जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच तुळजापूर शहरातील माजी नगरसेवक यांचा शिवसेनेत प्रवेश होणार असल्याचा दावा केला. या पक्षप्रवेश कार्यक्रमास शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख गणेश नेते, तुळजापूर शहर उपप्रमुख रमेश चिवचिवे, युवा नेते शहाजी हाक्के, भुजंग मुकेरकर, रितेश जावळेकर, नितीन मस्के, स्वप्निल सुरवसे यांच्यासह असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुळजापुरात ४१ रक्तदात्यांनी रक्तदान करून क्रांतिकारकांना केले अभिवादन




**आरंभ मराठी | तुळजापूर**

तुळजापूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, युवास्पंदन सामाजिक संस्था, रोटरी क्लब तुळजापूर व आर्ट ऑफ लिविंगच्या वतीने ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त व रक्षाबंधन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ४१ रक्तदात्यांनी रक्तदान करून क्रांतिकारकांना अभिवादन केले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन अमर हंगरगेकर ,सचिन घोडके, शहाजी जगदाळे, जगदिश पलंगे, रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. संतोष लोखंडे, सचिव राहुल तागड मा.अध्यक्ष प्रशांत अपराध, भरत जाधव, निवेदक संजय मैंदर्गे यांच्या हस्ते करण्यात आले. सिने कलावंत शंतनु गंगणे यांनी रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. यावेळी युवास्पंदन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महेंद्र कावरे, सतीश हुंडेकरी उपस्थित होते. शिबिराचा समारोप गणेश शेळके, डॉ.दिग्विजय कुतवळ, बबन गावडे यांच्या हस्ते करण्यात आला.

# जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त शिवाई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थ्यांचे पथनाट्याद्वारे जनजागृती अभियान

**आरंभ मराठी | उमरगा**

शिवाई चॅरिटेबल ट्रस्ट संचलित शिवाई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, कोरेगाववाडी येथील विद्यार्थ्यांनी जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त पथनाट्याद्वारे जनजागृती अभियान राबवले. स्पर्श ग्रामीण रुग्णालय सास्तुर, उपजिल्हा रुग्णालय उमरगा, शिवाई हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर सेंटर परिसरामध्ये अभियान राबवण्यात आले. स्तनपानाला प्राधान्य द्यावे, शाश्वत सहाय्यक प्रणाली निर्माण करा, नुकत्याच जन्मलेल्या बाळासाठी आईचे दूध महत्वाचे आहे, स्तनदाच्या दुधात बाळाच्या वाढीसाठी आवश्यक असणारी सर्व बाबी योग्य प्रमाणात असतात. यामुळे बाळाचा शारीरिक, मानसिक आणि भावनिक विकास होतो. तसेच हे दूध बाळाला पचायला सोपे असते. स्तनदाच्या दुधामध्ये रोगप्रतिकारक शक्ती असते. त्यामुळे निमोनिया, जुलाब आणि इतर संसर्गजन्य रोगापासून बाळाचा बचाव होतो. बाळाला कमीत कमी सहा



महिने स्तनदाचं दूध दिलं पाहिजे असे या पथनाट्याद्वारे सांगण्यात आले. यावेळी या अभियानामध्ये संस्थेचे सचिव डॉ. विजय बेडदुर्गे, डॉ. सारिका बेडदुर्गे, स्पर्श ग्रामीण रुग्णालयाचे समन्वयक रमाकांत जोशी, डॉ. कोमल गरड (वैद्यकीय अधीक्षक), डॉ.अरबाज पटेल, डॉ. आशितोष कदम, डॉ. मुसंडे, डॉ. प्रियंका राठोड (फिजीओथेरपीस्ट), पंचशीला वंताळकर(अधिपरिचारिका ), परिचारिका शिल्पा शिंदे, भक्ती भोसले, शमा तांबोळी (परिसेविका ), सुनिता पवार (अधिपरिचारिका), एस. एन. गाढवे (परिसेविका), संगीता काळे, ललिता चव्हाण तसेच यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ऑल्विन काळे, प्रा. स्नेहल धर्माधिकारी, प्रा.प्रशांत वाघमारे, प्रा.शुभम सूर्यवंशी, प्रा.प्रियंका राठोड, प्रा.अविनाश चौधरी, प्रा.अभिजीत पाटील, प्रा.शहाबाज शेख, प्रा.अविनाश कुंभार, प्रा.शुभांगी बंदीछोडे, प्रा.म ोनिका धुरे व हॉस्पिटल परिसरातील जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# तुळजापूर पोलीस ठाण्यातील पोलीस बांधवांना लाडक्या बहिणींकडून राखी



**आरंभ मराठी | तुळजापूर**

तुळजापूरातील लाडक्या बहिणींनी रक्षाबंधनानिमित्त शहरातील पोलीस बांधवाना राख्या बांधत सार्वजनिक रक्षाबंधन साजरे केले. रक्षाबंधनाच्या शुभ मुहूर्तावर शहरातील विविध भागातील महिलांनी पोलीस ठाण्यात जाऊन पोलीस बांधवाना राख्या बांधल्या. समाजाच्या रक्षणासाठी दिवस रात्र काम करणाऱ्या या योध्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी पोलीस कर्मचाऱ्यांचे औक्षण करून त्यांना मिठाई दिली आणि त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. यावेळी पोलीस बांधवानीही बहिनींचे आभार मानले आणि त्यांच्या रक्षणाचे वचन दिले. या भावपूर्ण वातावरणाने पोलीस ठाण्यात एक कौटुंबिक आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. यावेळी तुळजापूरचे पोलीस निरीक्षक आण्णासाहेब मांजरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नामदेव मद्दे, तुळजापूर महिला आघाडीच्या रक्षाबंधन संयोजिका सुरेखा नितीन पवार, तसेच रक्षाबंधन कार्यक्रमाच्या जिल्हा संयोजिका नंदा पुंगाडे व प्रियंका कदम, भाजपचे सरचिटणीस धैर्यशील दरेकर आदी उपस्थित होते.

# पांगरदरवाडी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक शांताराम कुंभार यांना विनोबा ॲपचा पुरस्कार प्रदान

**आरंभ मराठी | तामलवाडी**

पांगरदरवाडी शाळेतील शिक्षक शांताराम कुंभार यांना विनोबा ॲप'चा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. जिल्हा परिषदने पुण्यातील 'ओपन लिंक फाउंडेशनच्या' मदतीने 'विनोबा' हे खास मोबाईल ॲप विकसित केले असून, याच्या माध्यमातून आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यता कार्यक्रम राबविण्यात येत आहे. अध्यापन पद्धतीत होणारे बदल प्रत्येक शिक्षकाला घरबसल्या कळावेत, जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षक तंत्रस्नेही बनावेत हा या मागचा उद्देश आहे. तसेच या ॲपमुळे शिक्षकांचे प्रश्नही वेळेत सुटणार आहेत. गतवर्षीपासून धाराशिव जिल्ह्यात या कार्यक्रमाची प्रभावीपणे अंम लबजावणी सुरू असून जिल्ह्यातील अनेक प्राथमिक शिक्षक या ॲपचा प्रभावीपणे वापर करून शाळेतील नावीन्यपूर्ण उपक्रम, उल्लेखनीय बाबी,गुणवत्ता वाढीसाठी केलेले प्रयत्न, इ. या समाज माध्यमावर आदान प्रदान करीत असतात. ज्या शिक्षकाचा उपक्रम हा सर्वांपेक्षा वेगळा



व शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने उपयुक्त असतो, अशा उपक्रमाची दखल घेऊन त्या शिक्षकास विशिष्ट कालावधीत तालुका व जिल्हा स्तरावर पुरस्कार प्रदान केला जातो. जि प प्राथमिक शाळा पांगरदरवाडी येथील उपक्रमशील शिक्षक शांताराम विष्णू कुंभार यांनी त्यांच्या शाळेत विद्यार्थ्यांच्या इंग्रजी संभाषणासाठी व इंग्रजी शब्द समृद्धीसाठी राबविलेल्या विविध कृती,अध्ययन अनुभव, या ॲपवर प्रसारित केले होते. त्यांच्या या उपक्रमाची दखल घेऊन त्यांना तुळजापूर तालुक्यातून जानेवारी २०२५ ते जून २०२५ या कालावधीतील 'पोस्ट ऑफ द मंथ' हा पुरस्कार तुळजापूरचे गटशिक्षणाधिकारी अर्जुन जाधव, विस्ताराधिकारी मल्लिनाथ काळे यांच्या हस्ते गटशिक्षण कार्यालय तुळजापूर येथे प्रदान करण्यात आला. यावेळी विनोबा ॲपचे जिल्हा समन्वयक सोमनाथ स्वामी उपस्थित व इतर शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. तसेच सहशिक्षिका श्रीदेवी कोटमाळे, व सुरेखा भुतेकर या शिक्षकांनाही 'पोस्ट ऑफ द मंथ' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्राथमिक शिक्षकांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी हा कार्यक्रम उपयुक्त असून त्यांना अध्ययन–अध्यापन पद्धतीत मार्गदर्शन करण्यासाठी लाभदायी आहे. या प्लॅटफॉर्मवर सर्व प्राथमिक शिक्षकांना आता एका क्लिकवर एकमेकांशी अध्यापन विषयक ऑनलाईन संवाद साधने, नवे अध्यापन कौशल्य विकसित करणे, अध्यापन पद्धतीत सुधारणा करणे, विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठीच्या साहित्याबाबत चर्चा करता येणार आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त शिक्षकांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे अशा प्रकारचे आवाहन गटशिक्षणाधिकारी अर्जुन जाधव यांनी केले आहे.

# भाजपा महिला मोर्चाकडून उमरगा पोलीस ठाण्यात रक्षाबंधन सण उत्साहात साजरा



**आरंभ मराठी | उमरगा**

राखीच्या नात्याचा स्नेहबंध आणि कर्तव्याची भावना जपत, भाजपाच्या महिला मोर्च्याच्या वतीने उमरगा पोलीस ठाण्यात शनिवारी (ता.९) रोजी रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी पोलीस बांधवांना राखी बांधून त्यांच्या सेवाभावाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमात भाजपा माजी जिल्हा सचिव राणी राठोड, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष पूजा बालाजी माणिकवार, संगीता कडगंचे, बबिता पवार या पदाधिकाऱ्यांनी आपल्या सहकारी भगिनींसह पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक पिराजी तायवडे, पो. नि. रामहरी चाटे, पो.नि. श्रीकांत भराटे, पो.नि. पांडुरंग कन्हेरे, तसेच पोलीस कर्मचारी विष्णू मुंडे, नवनाथ भोरे, यासीन सय्यद, सतीश पाटील आणि इतरांना राखी बांधून शुभेच्छा दिल्या. या वेळी नूतन पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी यांचा भाजपाच्या वतीने आम्रवृक्षाचे रोप देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम ाला रोहिणी मंडले, भाग्यश्री रणदिवे, स्वाती पवार, दीपा ख्याडे, भाग्यश्री पवार, आकाशवाणी जाधव, त्रिशा गायकवाड, शरद पवार, पिंटू राठोड, विकी राठोड, बालाजी माणिकवार, यशपाल कांबळे, महेश कलशेट्टी आदी मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते. रक्षाबंधनाचा हा सोहळा भावनिक आणि देशसेवेचा गौरव करणारा ठरला. भगिनींनी पोलिस बांधवांच्या सुरक्षिततेसाठी आणि कर्तव्यनिष्ठेसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# कळंब-करंजकल्ला वळणावरील धोकादायक रस्त्याचे काम एक महिन्यात पूर्ण करण्याचे बांधकाम विभागाचे आश्वासन

**आरंभ मराठी | कळंब**

कळंब–करंजकल्ला वळणावरील धोकादायक रस्त्याचे काम एक महिन्यात पूर्ण करण्याचे बांधकाम विभागाचे आश्वासन करंजकल्ला वळणावरील अपघातप्रवण स्थितीबाबत नागरिकांच्या सातत्यपूर्ण मागणीला अखेर यश मिळाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने लेखी आश्वासन देत, एका महिन्याच्या आत आवश्यक सुरक्षा उपाययोजना पूर्ण करण्याचे आश्वासन आंदोलक अमर चाऊस यांना दिले आहे. या आश्वासनानंतर प्रस्तावित ११ ऑगस्ट रोजीचे रस्तारोको आंदोलन स्थगित करण्यात आले. काही दिवसांपूर्वी व्यापारी रमेश शिवराज होनराव यांचा करंजकल्ला वळण न समजल्याने झालेल्या अपघातात मृत्यू झाला होता. या घटनेनंतर स्थानिक नागरिक, शिवसेना (उबाठा) आणि तालुका व्यापारी म हामंडळाने कळंबलातूर रस्त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. लातूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने या मागणीची गंभीर दखल घेत, हायब्रीड ॲन्युटी अंतर्गत सुरू असलेल्या लातूरकळंब (रामा–२३६) रस्ता सुधारणा प्रकल्पातील उर्वरित काम तातडीने सुरू करण्याचे कंत्राटदारास आदेश दिले आहेत. प्रकल्पातील ८४ % काम पूर्ण झाले असून उर्वरित टप्पा जलदगतीने पूर्ण होणार आहे. सध्या सर्व पुलांवर रस्ता सुरक्षा फलक, पाईप डेलीनेटर, रिफ्लेक्टर बसवण्यात आले आहेत. करंजकल्ला व इतर धोकादायक वळणांवर सूचना फलक व क्रॅश बॅरिअर ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत लावले जाणार



आहेत. पावसाळा संपल्यानंतर पुलांची पुनर्बांधणी, रस्त्याचे डांबरीकरण, ड्रेनेज, रोड फर्निचर, शोल्डर फिलिंग, तसेच जंक्शन सुधारणा कामे तातडीने पूर्ण करण्याचेही आश्वासन विभागाने दिले आहे. यामुळे ११ ऑगस्ट रोजी नियोजित करंजकल्ला वळणावरील रस्तारोको आंदोलनाला तात्पुरती स्थगिती दिली आहे.

# सामाजिक कार्यकर्ते सैलानी शेख यांच्यातर्फे शिराढोण गावास घंटागाडी भेट

**आरंभ मराठी | शिराढोण**

कळंब तालुक्यातील शिराढोण येथील युवा उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते सलीम उर्फ सैलानी गणी शेख यांच्याकडून स्वखर्चातून गावातील ओला व सुका कचरा जमा करण्यासाठी घंटा गाडी भेट देण्यात आली. त्याचे लोकार्पण शिराढोण पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक धरणीधर कोळेकर व माजी जिल्हा परिषद सदस्य शहाजी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कचरा कुंड्याचेही लोकार्पण करण्यात आले. कचरा कुंड्या गावातील व्यापाऱ्यांना देण्यात आल्या. घंटा गाडीच्या इंधन व चालकाचा पूर्ण खर्च सामाजिक कार्यकर्ते सैलानी शेख स्वतः करणार आहेत. यावेळी भाऊसाहेब पाटील, राजेश्वर पाटील, उपसरपंच अमोल माकोडे, नितीन आबा पाटील, पद्माकर पाटील,नासेर पठाण,बाळासाहेब सोनके ग्राम पंचायत सदस्य ॲड नितीन यादव,अय्युब खुरेशी,राजू डांगे,सुमंत नाईकवाडे, आकाश धाकतोडें,अमोल नाईकवाडे,सलमान बडे,मतीन बागवान,सलमान बडे, बब्बु खुरेशी,शिवाजी गाडे,श्रीपाद कापसे,राजेंद्र



### वाढदिवसाच्या निमित्ताने गावासाठी योगदान

शिराढोण येथील उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते सैलानी शेख यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने त्यांनी गावाच्या विकासात हातभार म्हणून आरोग्य, स्वच्छता यास प्राधान्य देऊन गावातील कचरा व्यवस्थापन करण्यासाठी नवीन घंटा गाडी व एक हजार कचरा कुंड्या भेट दिल्या आहेत. या योगदानाचे गावातील नागरिकांतून त्यांचे कौतुक होत आहे.

वाघमारे,उत्तम खडबडे,मकबूल डांगे,कलीम बागवान,मनोज पाटील,अलीकबर पठाण, ताजखान पठाण, अवधूत पाटील, अमीर डांगे,सुरेश म ाकोडे,दादा खतीब,नूर डांगे,ॲड. अमोल माकोडे,संजय नानजकर आदींची उपस्थितीत होती.

# रोटरी क्लबतर्फे स्वआधार केंद्रात रक्षाबंधन;१२१ गतिमंद मुलींना स्नेहाची राखी

आरंभ मराठी | धाराशिव

भावाचा हात, बहिणीची राखी आणि नात्यांची गाठ हा रक्षाबंधनाचा सण बहिण–भावाच्या प्रेमाचा असला, तरी काही बंध हे रक्ताच्या नात्यापेक्षाही अधिक घट्ट असतात. अशाच नात्यांचा सुंदर संगम धाराशिव नजिकच्या आळणी पाटी येथील आधार केंद्रात पाहायला मिळाला. रोटरी क्लब धाराशिवच्या वतीने स्वआधार केंद्रातील १२१ गतिमंद मुलींना राखी बांधून भावबंधाचा सण साजरा करण्यात आला. स्वआधार केंद्र हे वय वर्ष ८ ते ३५ वयोगटातील गतिमंद



मुलींचे संगोपन करणारे महत्त्वाचे केंद्र असून, येथे ३० म हिला मदतनीस दोन शिफ्टमध्ये मुलींची देखभाल, शिक्षण आणि दैनंदिन गरजांची पूर्तता करतात. या मुलींच्या चेहऱ्यावर आनंदाची लकेर आणणे, त्यांना सुरक्षितता आणि आत्मविश्वास देणे हे या संस्थेचे ध्येय आहे. रक्षाबंधनाच्या निमित्ताने रोटरी क्लबचे अध्यक्ष रणजीत रणदिवे, सचिव प्रदीप खामकर आणि रोटेरियन डॉ. अभय शहापूरकर यांनी स्वआधार केंद्राला भेट दिली. मुलींनी राखी बांधताच उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटले. हा क्षण केवळ एक सण नसून हृदयाला भिडणारा भावनिक अनुभव ठरला. कार्यक्रमात स्वआधार केंद्राच्या कर्मचारीवर्गाने संस्थेच्या कार्याचा आढावा दिला. यावेळी रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी भविष्यात केंद्राच्या आवश्यक गरजांसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या उपक्रमामुळे रक्षाबंधनाचा सण केवळ विधीपुरता न राहता, तो माणुसकीचा आणि आपुलकीचा संदेश देणारा ठरला. समाजातील वंचित घटकांपर्यंतही प्रेम, जिव्हाळा आणि बंधुभाव पोहोचू शकतो, हे रोटरी क्लबने या दिवशी दाखवून दिले

# उसावर पांढऱ्या माशीचा वाढता कहर; प्रतिबंधात्मक उपाय करण्याची गरज

## योग्य पाण्याचा निचरा,खत व्यवस्थापन आणि जैविक कीड नियंत्रणावर भर देण्याचे आवाहन





हर्षवर्धन मडके | आरंभ मराठी

मोहाः कळंब तालुक्यातील ऊस पट्ट्यात सध्या पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत असून शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. विशेषतः आडसाली आणि तुटून जाणाऱ्या ऊसावर या किडीचा जास्त प्रादुर्भाव आढळून येत आहे. हवामानातील अनुकूल परिस्थिती, पिकाला पाण्याचा ताण, पाणथळ किंवा दलदलीची जमीन, तसेच नत्रयुक्त खतांचा अभाव हे किडीच्या वाढीस पोषक ठरत असल्याचे कृषी विभागाचे निरीक्षण आहे. पांढरी माशी पानांच्या मागील बाजूस अंडी घालते. अंड्यातून बाहेर पडलेली पिल्ले व प्रौढ दोन्हीही ऊसाच्या पानांतील अन्नरस शोषून पानांचा हिरवटपणा कमी करतात. त्यामुळे पाने पिवळसर–तांबूस पडून वाळतात. पिल्ले मधासारखा चिकट पदार्थ सोडतात, ज्यामुळे काळी बुरशी वाढते आणि ऊसाच्या प्रकाश संश्लेषण प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. परिणामी ऊसाची वाढ खुंटते व उत्पादनात घट येते.

### किडीची वाढ होण्याची प्रमुख कारणे

शेतात पाणी साचणे, आर्द्रतेत वाढ, शिफारशीपेक्षा कमी नत्र–स्फुरदाची मात्रा,क्षारयुक्त व पाण्याचा निचरा न होणारी जमीन, लांब व रुंद पानांच्या ऊस जातींची लागवड यांमुळे ऊसावर किडीची वाढ होते. किडीची वाढ झाल्यास त्याचा ऊस उत्पादनावर परिणाम होतो.

### व्यवस्थापन व उपाय

कृषी तज्ज्ञांच्या मते, योग्य पाण्याचा निचरा, शिफारशीनुसार खत व्यवस्थापन, प्रादुर्भावग्रस्त पाने कापून नष्ट करणे, कमी संवेदनशील जातींची निवड फुले ०२६५), आणि जैविक नियंत्रण पद्धतींचा वापर करून या किडीवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. जैविक पद्धतींमध्ये 'व्हर्टिसिलीअम लिकॅनी' फवारणी, 'क्रायसोपरला कार्निया' भक्षक किडींचा प्रसार, निंबोळीआधारित किटकनाशके, तसेच चवळी–मुग यांसारखी पिके पट्ट्यांमध्ये लावून मित्र किडी वाढवणे या उपायांचा समावेश आहे.

### रासायनिक नियंत्रण

प्रादुर्भाव गंभीर असल्यास डायमेथोएट ३०% प्रवाही, थायमिथॉक्झाम २० डब्ल्यूजी, ॲसिफेट ७५% पावडर, क्लोरोपायरीफॉस २०% ईसी किंवा इमिडाक्लोप्रीड १७.८ एस.एल. यापैकी शिफारशीनुसार फवारणी करावी. किड पानांच्या खालच्या बाजूला असल्याने नोझल खालच्या दिशेने धरून फवारणी करणे अत्यावश्यक आहे.

### शेतकऱ्यांनी जैविक उपायांना प्राधान्य द्यावे

शेतकऱ्यांनी ऊस पिकातील पांढऱ्या माशीचा प्रारंभीच बंदोबस्त करण्यासाठी जैविक उपायांना प्राधान्य द्यावे. पाणी साचणार नाही, खत योग्य प्रमाणात व योग्य वेळी द्यावे, तसेच प्रादुर्भाव दिसताच वेळेवर फवारणी करावी, यामुळे किड नियंत्रण शक्य आहे.

**बालाजी देशमुख**
सहायक कृषी अधिकारी, मंगरूळ

# आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेल्या नागरिकांनी मानधनासाठी अर्ज करावा

## नळदुर्ग येथील अपर तहसीलदार यांचे आवाहन

आरंभ मराठी | नळदुर्ग



१९७५ ते १९७७ मधील आणीबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरीता लढा देणाऱ्या ज्या व्यक्तींना कारावास भोगावा लागला होता, अशा व्यक्ती जानेवारी २०१८ पुर्वी हयात नसल्यास त्यांच्या पश्चात्या हयात जोडीदार पती किंवा पत्नी केवळ अशा व्यक्तींना मानधन मिळण्याकरीता १५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या शासन पुरक पत्रासोबतच्या परीशिष्ट ब मधील शपथपत्र जोडुन नळदुर्ग येथील अप्पर तहसिल कार्यालय अथवा जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावे असे आवाहन नळदुर्ग अप्पर तहसिल कार्यालयाचे अप्पर तहसिलदार प्रमोद गायकवाड यांनी केले आहे. १९७५ ते १९७७ या आणीबाणीच्या कालावधीत लोकशाही वाचविण्यासाठी ज्यांनी कारावस भोगला आहे अशा व्यक्ती २ जानेवारी २०१८ पुर्वी हयात नसल्यास त्यांच्या पश्चात्य त्यांचे हयात जोडीदार पती /पत्नी केवळ अशा व्यक्तींनाच मानधन मिळण्याकरीता अर्ज दाखल करण्याची अंतीम तारीख ही १५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या शासन पुरक पत्रासोबतच्या परीशिष्ट ब मधील शपथपत्र शासन निर्गमित झाल्याच्या तारखेपासुन ९० दिवसांपर्यंत राहणार आहे. त्याचबरोबर कोणत्याही परीस्थितीत २५ सप्टेंबर २०२५ नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेऊ नये असे सुचित करण्यात आले आहे. नळदुर्ग शहर व परीसरातील ज्या व्यक्ती हा लाभ घेण्यास पात्र आहेत त्यांनी २५ सप्टेंबरपूर्वी नळदुर्ग येथील अप्पर तहसिल कार्यालय अथवा जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावेत असे आवाहन अप्पर तहसिलदार प्रमोद गायकवाड यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शिबीरात ३९० रुग्णांची तपासणी व उपचार

आरंभ मराठी | धाराशिव

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील गणेश नगर येथे घेण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिरात ३९० जणांची तपासणी व त्यांच्यावर उपचार करण्यात आले. श्री गणेश नगर येथे मोफत सर्वरोग निदान व उपचार आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांमध्ये विनामूल्य आरोग्य तपासणी, उपचार करण्यात आले. नगर परिषद शाळा क्र.२०, येथे मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ३९० रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. यापैकी ७३ रुग्णांना शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याने त्यांच्यावर तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल, नेरुळ येथे पुढील उपचार करण्यात येणार आहेत. या वेळी प्रमुख पाहुणे माजी शहराध्यक्ष अभय इंगळे, इंद्रजित देवकते, किशोर पवार,



नाना पवार, अनिल सावंत, चेतन माने, सोमनाथ सर्जे, विश्वास यादव, रामचंद्र कोळी आदी उपस्थित होते. यावेळी मुंबईचे डॉ.अजित निळे, डॉ.चांडक अवधेश, डॉ. देशमुख आयुष, डॉ. आयुष पांडे, डॉ. थूल पियुष यांनी रुग्णांची तपासणी करुन औषधोपचार केले. तसेच तेरणा जनसेवा केंद्राचे, अमिन सय्यद, सचिन व्हटकर आरोग्य मित्र अक्षय लोमटे व बाबासाहेब भांगे यांनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात वाहतूक नियमभंगाविरुद्ध कारवाई, अडीच लाखांचा दंड वसूल

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहर वाहतूक शाखा आणि संबंधित पोलिस ठाण्यांकडून ८ ऑगस्ट रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा नियमभंग प्रकरणी एकूण ३२९ कारवाया करून तब्बल २,५२,९५० रुपये तडजोड शुल्क वसूल केले. ८ ऑगस्ट रोजी महाराणा प्रताप चौक आणि लोकमंगल मल्टीस्टेट बँकेसमोर रस्त्यावर धोकादायकरीत्या वाहन उभे केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हे दाखल झाले.याप्रकरणी किरण देविदास राठोड (रा. शिंगोली तांडा)(ॲटो रिक्षा २५ १८६२), राणा संभाजी पेठे (रा. सांजा रोड) (वाहन २५ ३२०३), सुनील लिंबाजी पेठे (रा. सांजा रोड) (वाहन २५ २६६६) यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

# पूरस्थिती; महाराष्ट्रातील पर्यटक सुरक्षित

**मुंबई:–** उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली परिसरात झालेल्या भीषण भूस्खलन आणि पूरस्थितीमुळे महाराष्ट्रातील विविध भागांतील १७२ पर्यटक या परिसरात अडकले होते. त्यापैकी १७१ पर्यटकांशी संपर्क साधला असून ते सुरक्षित आहेत. एक पर्यटक श्रीमती कृतिका जैन यांचा शोध सुरू असून, त्यासाठी राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, उत्तराखंडला सूचना देण्यात आल्या आहेत.

# रस्ता अपघातात दोन जणांचा मृत्यू

आरंभ मराठी | धाराशिव

वेगवेगळ्या दोन मोटारसायकल अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून, वाशी आणि शिरढोण पोलिस ठाण्यात गुह्याची नोंद करण्यात आली आहे. या घटना जून म हिन्यातील आहेत.मात्र याची नोंद नुकतीच झाली आहे. वाशी पोलीस ठाणे अंतर्गत१२ जून रोजी संध्याकाळी ६ ते ६.३० वाजताच्या दरम्यान मांडवा (ता. वाशी) येथील ७४ वर्षीय भिमराव शिवाजी गरड हे सरमकुंडी येथून पायी जात असताना बारलोणी पारधी पिढीसमोर अज्ञात वाहनाने पाठीमागून धडक दिली. गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. फिर्यादी विठ्ठल भिमराव गरड यांच्या तक्रारीवरून भा.न्या.सं. कलम २८१, १०६(१) सह १८४, १३४(अ)(ब) मोवाका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर शिराढोण पोलीस ठाणे अंतर्गत १ जून रोजी रात्री ९.५० वाजता सौंदाना आंबा (ता. कळंब) येथील गणपत धोंडीराम पालकर (४६) हे मोटरसायकलवरून (क्र. १४ २५८१) जात असताना हायगय व निष्काळजीपणे वाहन चालवल्याने अपघात झाला. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. दयानंद धोंडीराम पालकर यांच्या फिर्यादीवरून भा.न्या. सं. कलम १०६(१), १२५(अ)(ब) अंतर्गत गुन्हा नोंद.

# मुरुड शहर आणि परिसरात रक्षाबंधन सण उत्साहात साजरा

आरंभ मराठी | मुरुड

मुरुड व परिसरामध्ये राखी पौर्णिमा म्हणजेच रक्षाबंधन सण उत्साहात पार पडला. राखी पौर्णिमेनिमित्त गेल्या आठ दिवसापासून गावात जागोजागी वेगवेगळ्या प्रकारच्या राख्यांचे स्टॉल लावलेले होते. गेल्या आठ दिवसापासून अनेक माता भगिनींनी राख्या खरेदी करण्यासाठी म ार्केटमध्ये गर्दी केल्याचे दिसून आले. शनिवारी राखी पौर्णिमेनिमित्त प्रत्येक बहिणीने आपल्या भावाला राखी बांधून ओवाळणी केली. तसेच सासरी गेलेल्या अनेक भगिनी माहेरी भावाला राखी बांधण्यासाठी आल्याचेही दिसून आले. राखी पौर्णिमा हा एक महत्त्वाचा हिंदू धर्मियांचा सण आहे, जो बहीण भावांच्या अतूट प्रेम आणि आपुलकीचे प्रतीक आहे. हा सण श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला साजरा केला जातो. या दिवशी बहिण आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधते. ज्यामध्ये प्रेम, सुरक्षा आणि चांगल्या आरोग्याची तसेच भरभराटीची उत्साह व आनंदाची भावना असते. भाऊ आपल्या बहिणीला आयुष्यभर तिचे रक्षण करण्याचे वचन देत असतो. राखी पौर्णिमेच्या दिवशी भाऊ जगाच्या पाठीवर कुठेही असला तरी पौर्णिमेला बहिणीकडे राखी बांधण्यासाठी आवर्जून जातो. या दिवशी बहिण भावासाठी उपवास करते आणि देवाला त्याच्या चांगल्या आरोग्याची प्रार्थना करते. या सणामुळे बहीण भावांच्या नात्यात अधिक प्रेम आणि जवळीक वाढते आणि दैनंदिन जीवनामध्ये सुद्धा बहीण भाऊ एकमेकांच्या सल्ल्याने व मार्गदर्शनाने आपल्या आयुष्याचे मार्गक्रमण करतात. हा सण केवळ रक्ताच्या नात्यातील भावंडासाठीच नाही तर समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी मित्राने नातेवाईकासाठी देखील साजरा केला जातो. या दिवशी लोक एकमेकांना राखी बांधून प्रेम आणि आपुलकी व्यक्त करतात. यंदा पाऊस समाधानकारक झाल्याने श्रावणातील पहिला सण म्हणजे राखी पौर्णिमा अतिशय उत्साहात मुरुड व परिसरात साजरा करण्यात आला.

# मेलडी स्टार्सच्या वतीने मल्हारी माने यांचा सत्कार

**धाराशिव** –समतानगर नळे व्हीला येथे कलाविष्कार अकादमी द्वारा मेलडी स्टार्सचे सह समन्वयक मल्हारी माने यांची उपशिक्षणाधिकारी पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी म ेलडी स्टार्सचे मुख्य प्रवर्तक युवराज नळे, जेष्ठ कवी राजेंद्र अत्रे, समन्वयक शरद वडगावकर, शेषनाथ वाघ, रवींद्र कुलकर्णी, धनंजय



कुलकर्णी, मुकुंद पाटील, राजाभाऊ कारंडे, रविंद्र शिंदे, धाराशिव जिल्हा साहित्य भारतीचे जिल्हाध्यक्ष भागवत घेवारे उपस्थित होते.

# धाराशिव प्रशालेत ऑगस्ट क्रांती दिन उत्साहात साजरा





आरंभ मराठी | धाराशिव

उस्मानाबाद जिल्हा स्वातंत्र्यसैनिक समिती संचलित धाराशिव प्रशाला व स्वामी रामानंद तीर्थ प्राथमिक विद्यामंदिर येथे ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी भास्करराव नायगावकर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी दिलीप गणेश, सुरेश धारूरकर, ॲड.सुग्रीव नेरे, अरुण माडेकर, बालाजी जाधव, धनंजय माळी आदींची उपस्थिती होती

जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक भास्करराव नायगावकर यांनी विद्यार्थ्यांना तन, मन, धनाने देशासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. तसेच आरोग्यासाठी मैदानी खेळांचे महत्त्व सांगून शाळेला म ल्लखांब भेट दिला. सचिव दिलीप गणेश यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाची आठवण करून दिली. त्यांनी ८ ऑगस्ट १९४२ रोजी काँग्रेस कमिटीच्या भारत छोडो आंदोलनाचा संदर्भ देत महात्मा गांधी व पंडित नेहरू यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या लढ्याचे महत्व स्पष्ट केले. ९ ऑगस्ट रोजी आझाद मैदानावर झालेल्या वंदे मातरम घोषणांमुळे जनसागर उसळला आणि इंग्रज सरकारने त्याचा धसका घेतल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे सुरेश धारुरकर यांनी स्वातंत्र्य संग्रामातील बलीदानाचे स्मरण केवळ स्मृतिदिनापुरते मर्यादित न ठेवता ते कायम जपण्याचे आवाहन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी क्रांती दिनाबद्दल भाषण देत मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक पंडित जाधव यांनी केले. सूत्रसंचालन चंद्रकांत माळी तर आभार प्रदर्शन रमण जाधव यांनी केले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून सांगता करण्यात आली. यावेळी दोन्ही शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जवाहर महाविद्यालयातील मुलींचे पोलीस बांधवांसोबत रक्षाबंधन

आरंभ मराठी | नळदुर्ग

अणदूर येथील जवाहर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील संस्कृतच्या विद्यार्थिनींनी शनिवारी (दि.९) रक्षाबंधन निमित्त नळदुर्ग पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राख्या बांधून औक्षण केले. जवाहर महाविद्यालयातील संस्कृत विभाग प्रमुख प्रा. डॉ. सत्येंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी नळदुर्ग पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक सचिन यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद कांगूने, पोलीस उपनिरीक्षक संतोष गीते, अविनाश दांडेकर, सूर्यकांत फुलसुंदर, बालाजी शिंदे यांच्यासह उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही राख्या बांधून भाऊ–बहिणीचा स्नेह जोपासला. रक्षाबंधनचा सण असताना सुद्धा ज्या पोलीस बांधवांना कर्तव्यावर असल्याने त्यांना आपल्या बहिणीकडे जाता येत नाही, अशा पोलिस बांधवांना महाविद्यालयातील संस्कृत विषयाच्या विद्यार्थिनी शीतल नरे, सदिच्छा करंडे, सानिका चव्हाण, भक्ती स्वामी, स्नेहा मटगे, साक्षी चव्हाण, अर्चना राठोड, प्रीती



चंदनशिवे, खुशी गायकवाड, रमा चिमणे, लक्ष्मी शेवाळकर, प्रज्ञा चंदनशिवे, सरोज काळे, सुहाना पटेल, फिजा मुर्शाद, प्रतिक्षा मातोळे, प्रियंका ढाकणे, माधुरी गायकवाड, प्रज्ञा चंदनशिवे यांनी राखी बांधून पोलिस बांधवांच्या समृद्ध निरोगी जीवनासाठी प्रार्थना केली. यावेळी पोलिस भगिनी शकिरा तांबोळी यांनी प्रा. सत्येंद्र राऊत यांना राखी बांधली. सर्व भगिनींना ओवाळणी म्हणून पोलिस निरीक्षक सचिन यादव व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने चाकलेट व पेन भेट देण्यात आले. या पवित्र सणानिमित्त पोलिस निरीक्षक सचिन यादव यांनी सर्व मुलींना मार्गदर्शन केले व समाजातील सर्व भगिनींचे रक्षण करण्यासाठी आम्ही अहोरात्र कटिबद्ध आहोत असे सांगितले. पोलिस बंधूना राख्या बांधून आनंद झाल्याचे सरोज काळे या विद्यार्थिनीने सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व प्रस्तावना संस्कृत विभाग प्रमुख प्रा.सत्येंद्र राऊत यांनी केले तर आभारप्रदर्शन सदिच्छा करंडे हिने मानले. यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.